


वर्ष ४८ वे

अंक ४ था

१० एप्रिल २०२६

किंमत १ रुपया


अग्रतश्चतुरो वेदा: पृष्ठत: सशरं धनु: ।
इदं ब्राह्ममिंद क्षात्रं शापादपि शरादपि ॥

# चित्तपावन मित्र

## सस्नेह निमंत्रण...

## श्री परशुराम जन्मोत्सव - २०२६

### श्री परशुराम पुरस्कार - वेद पुरस्कार सोहळा

रविवार दिनांक १९ एप्रिल २०२६ रोजी श्री परशुराम जन्मोत्सव साजरा होणार असून या निमित्ताने आपल्या ज्ञातीमधील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा आपण श्री परशुराम पुरस्कार देऊन सन्मान करीत असतो.

या वर्षी आपण सह्याद्री आदिवासी बहुविध सेवा संघ या देवबांध, मोखाडा येथील प्रकल्पाचे प्रमुख आदरणीय श्री. वसंतराव साठे यांना हा पुरस्कार प्रदान करणार आहोत.

त्याचबरोबर वेद अध्यापनाचे कार्य करणाऱ्या चारही वेदांच्या शाखेतील अध्यापकांचा देखील आपण श्री परशुराम वेद पुरस्कार २०२६ देऊन सन्मान करणार आहोत. यात वेदमूर्ती ऋषिकेश अमित जोशी (ऋग्वेद) वेदमूर्ती स्वप्नील सोमनाथ जोशी (यजुर्वेद) वेदमूर्ती दिनेश कोंडूदेव जोशी (अथर्ववेद) वेदमूर्ती धोंडोपंत कांतराव शिराढोणकर (सामवेद) यांचा समावेश आहे. तसेच प्रतीवर्षाप्रमाणे वयाची पंचाहत्तरी पूर्ण केलेल्या सभासद बंधू भगिनींचा अमृत महोत्सवी सत्कार देखील आपण करणार आहोत.

या कार्यक्रमास राज्यसभा खासदार सौ. मेधाताई कुलकर्णी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत.

ह्या कार्यक्रमाला सर्व सभासद बंधू भगिनींनी अवश्य उपस्थित राहावे व कार्यक्रमानंतर होणाऱ्या सुरूची भोजनाचा आस्वाद घ्यावा. यासाठी हे आग्रहाचे निमंत्रण.

-: आपले :-
विश्वस्त आणि कार्यकारी मंडळ

वार व दिनांक : रविवार, १९ एप्रिल २०२६
कार्यक्रम वेळ : सायंकाळी ६ ते ८
ठिकाण : डॉ. बापये सभागृह, श्री परशुराम भवन, सीबीएस, नाशिक.

## श्री परशुराम जन्मोत्सव

निमित्त हार्दिक शुभेच्छा...



## अक्षय्य तृतीया

निमित्त हार्दिक शुभेच्छा !

# अयोध्येतील राम मंदिर परिक्रमा मार्ग ते राष्ट्रपती भवनातील राजगोपालाचारी शिल्प एक दैदीप्यमान कामगिरी.

आपल्या संस्थेचे सभासद, नाशिकमधील मूर्तीकार लोंढेंच्या तिसऱ्या पिढीतील मूर्तीकार व संस्थेच्या श्री परशुराम भवन वर स्थापित श्री परशुराम कलाकृतीचे निर्माते श्री. संदीप लोंढे यांनी घडविलेल्या स्वातंत्र्य सैनिक, भारताचे एकमेव आणि शेवटचे गव्हर्नर जनरल सी. राजगोपालाचारी (राजाजी) यांच्या अर्धकृती पुतळ्याचे अनावरण नुकतेच राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रपती भवनात करण्यात आले.

त्याचबरोबर अयोध्या येथील श्री राम मंदिरात निर्माणाधीन परिक्रमा मार्गावर रामायणातील प्रसंगांवर आधारित सुमारे १००० रनिंग फिट इतक्या भव्य आकाराचे शिल्प घडवण्याचा सन्मान देखील त्यांना प्राप्त झाला. संपूर्ण भारतातून या कामासाठी फक्त दोन मूर्तीकार निवडण्यात आले होते. त्यात श्री. संदीप लोंढे यांच्या शिल्पांना स्थान देण्यात आले.

त्याबद्दलचे त्यांचे मनोगत.



**''काळाराम मंदिर ते अयोध्या राम मंदिर असा झालेला प्रवास अत्यंत सुखदायक आहे. अयोध्याच्या राम मंदिरात रामायण शिल्प घडवण्याची अचानक चालून आलेली संधी माझ्या कला प्रवासातला अत्यंत मानाचा बिंदू म्हणायला हरकत नाही. सुमारे १००० रनिंग फूट असे हे मोठे आणि महत्वाचे काम, इतर अनेक कलाकारांबरोबर साकारण्याचे भाग्य लाभले. याला गेल्या जन्माची पूर्व पुण्याई असेच म्हणावे लागेल.**


**याकरिता महाराष्ट्रातून झालेली केवळ दोघांची निवड हा एक मानाचा बिंदू आहे. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार व कला अभ्यासक श्री. वासुदेव कामत यांच्या संपूर्ण स्केचेसवर आधी मातीचे शिल्प घडवणे त्यावर चर्चा होऊन काही बदल असल्यास घडवणे, कामत सरांच्या अभ्यासू नजरेतून आलेले अनेक बारकावे पुन्हा पुन्हा साकार करणे, त्यानंतर प्रत्येक शिल्पाचे साचे तयार करून ते फायबरमध्ये घडवून मग बन्सी पहाडपूर या दगडात घडवण्यासाठी पाठवणे यासारखी वेळखाऊ व किचकट कामे सुमारे दीड ते दोन वर्षे चालली. या कामासाठी झालेला अभ्यास व अनेक बारकाव्यांचा झालेला तपशीलवार उहापोह हा माझा कलाविषयक दृष्टिकोन विस्तारणारा होता. इतर व्यावसायिक कामे आणि हे काम ह्यात मातीत साकारण्याच्या दृष्टीनेही खूपच फरक होता.**

**श्रीरामांचे जीवनचरित्र.. वेगवेगळ्या प्रसंगांतील प्रत्येकाच्या चेहऱ्यावरील भाव साकारणे हे निश्चित आव्हानात्मक होते. दैवी व्यक्तिमत्व पण सर्वसामान्य व्यक्तींच्या नजरेतून बघून घडवणे हे कला प्रवासातील आव्हानच होते.**


**नुकतेच भारताच्या महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते याचे लोकार्पण झाले. राष्ट्रपती भवन येथे बसवलेल्या राजगोपालाचारी यांच्या ब्राँझ धातूच्या पुतळ्यानंतर हे महत्वाचे कार्य हातून घडल्याने शिल्पकार लोंढे घराण्याच्या तिसऱ्या पिढीचे वारसदार असल्याचे सार्थक झाल्याची भावना आहे.**

**संदीप लोंढे, नाशिक**
**मूर्तीकार**









# श्री परशुराम वेद पुरस्कार - सत्कारमूर्तींचा अल्प परिचय



### ऋग्वेद वेदमूर्तींचा परिचय
### वेदमूर्ती ऋषिकेश अमित जोशी

ऋषिकेश यांचा जन्म दापोली तालुक्यातील करंजगाव येथे २२ डिसेंबर, १९९७ रोजी झाला. प्राथमिक शालेय शिक्षण इयत्ता चौथीपर्यंत गावातील शाळेत घेतल्यानंतर वयाच्या १० व्या वर्षी मालवण तालुक्यातील वायंगणी येथील घनपाठी वेदमूर्ती दत्तात्रय महादेव मुरवणे यांच्याकडून, गुरुगृही राहून, गुरुकुल पद्धतीने वेदाध्ययनाला सुरुवात करून सर्व वेदाध्ययन १३ वर्षांमध्ये त्यांच्याकडेच पूर्ण केल्यानंतर वेदाध्ययनातील विविध परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन आज वेदमूर्ती ही पदवी प्राप्त केल्यानंतर स्वगृही म्हणजे करंजगाव या आपल्या जन्मगावी परत येऊन वेदमूर्ती म्हणून ते रत्नागिरी जिल्ह्यात कार्यरत आहेत.

सध्या शिक्षण क्षेत्रात उपलब्ध असलेल्या कोणत्याही विद्या शाखेची पदवी घेण्याचा मोह न ठेवता वैदिक शिक्षणामधील सर्वोच्च अशा प्रकारची वेदमूर्ती ही पदवी आत्मसात करण्याचे ठरवून त्यात आज ऋषिकेश पारंगत झाले आहेत, हे नक्कीच भूषणावह आहे. याआधी रत्नागिरीतील वेदमूर्ती आठल्ये गुरुजी हे पहिले वेदशास्त्रसंपन्न वेदमूर्ती म्हणून रत्नागिरी जिल्हा व महाराष्ट्रात प्रसिद्ध होते. दशग्रंथासहित घनांत परीक्षा सन २०२२ मध्ये उत्तीर्ण झाले असून अशा प्रकारची परीक्षा देणारे ऋषिकेश हे जिल्ह्यातीलच नाही तर संपूर्ण देशातील पहिले विद्यार्थी आहेत.

**ऋषिकेश यांनी आजपर्यंत दिलेल्या परीक्षा**

- २०१३ समग्र ऋग्वेद संहिता परीक्षा – प्रथम श्रेणीत उत्तीर्ण
- २०१५ समग्र ऋग्वेद शाखा परीक्षा – प्रथम श्रेणीत उत्तीर्ण
- २०१७ विशेष परीक्षा :– समग्र ऋग्वेद समग्र शाखा, उपग्रंथासह म्हणजेच दशग्रंथासहित संपूर्ण ऋग्वेद परीक्षा – प्रथम श्रेणीत उत्तीर्ण. ही परीक्षा देणारा एकमेव विद्यार्थी.
- २०१८ षडङ्गवित् ही पदवी प्राप्त केली.
- २०१९ ऋग्वेद पदपाठ परीक्षा – प्रथम श्रेणीत उत्तीर्ण
- २०२०-२१ ऋग्वेद जटापाठ व घनपाठ अध्ययन करून वायंगणी ता. मालवण येथील ''ऋग्वेद गुरुकुल'' येथे गुरुकुलातील दोन सहाध्यायांसोबत ऑक्टोबर, २०२१ मध्ये ''घनपारायण'' करून घनपाठी ही पदवी प्राप्त केली.
- २०२१ घनपाठाची परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण.
- २०२२ दशग्रंथासहित घनांत परीक्षा उत्तीर्ण.
- ऋषिकेश यांनी आजपर्यंत अनेक सामुहिक संहिता पारायण व स्वाहाकार कार्यक्रमात सहभाग घेतला असून त्यापैकी निवडक जवळपास ४० ऋग्वेद संहिता स्वाहाकारात सहभाग.
- सहस्त्रबुद्धे मठ, पुणे – दशग्रंथ पारायण व शाखा पारायण
- श्री क्षेत्र दत्तधाम, नाशिक.

आजपर्यंत वेदशास्त्रोत्तेजक सभा, पुणे यांचे अनेक पुरस्कार ऋषिकेश यांना मिळाले आहेत

- टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुरस्कार.
- कै. कमल शरदचंद्र जोगळेकर पुरस्कार.
- कै. किंजवडेकर घनपाठी पुरस्कार.
- रजनी गंगाधर जोशी पुरस्कार.

---



### यजुर्वेद – वेदमूर्तींचा परिचय
### वेदमूर्ती स्वप्नील सोमनाथ जोशी

स्वप्नील सोमनाथ जोशी यांचा जन्म १६ एप्रिल १९९१ रोजी झाला.

यांनी गुरु शिष्य परंपरेनुसार शुक्ल यजुर्वेद माध्यंदिन शाखेचे प्राथमिक शिक्षण वेदमूर्ती श्री. शांतारामशास्त्री भानोसे गुरुजी तसेच वेदमूर्ती श्री. दिनेशशास्त्री गायधनी गुरुजी यांच्याकडे वैदिक ज्ञान विज्ञान संस्कृत महाविद्यालय (गुरुकुल) नाशिक येथे पूर्ण केले.

पुढे शतपथ ब्राह्मण, बृहदारण्यक उपनिषद, पद, क्रम, जटा, घन इत्यादी ग्रंथांचे अध्ययन वेदमूर्ती स्मार्त चूडामणी पंडित श्री. शांताराम शास्त्री भानोसे गुरुजी यांचेकडे पूर्ण केले. तसेच महर्षी सांदिपनी राष्ट्रीय वेद विद्या प्रतिष्ठान उज्जैन, कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय नागपूर, वेदांत विद्यापीठ अहिल्यानगर, वेद पोषक सभा शृंगेरी कर्नाटक, वेद रक्षण निधी ट्रस्ट कांची तमिळनाडू, वेदशास्त्रोतेजक सभा पुणे, सहस्त्रबुद्धे मठ पुणे अशा अनेक संस्थांमध्ये शतपथ ब्राह्मण, पदक्रम, जटा, घन इत्यादी परीक्षा प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण केल्या आहेत.

शुक्ल यजुर्वेद माध्यंदिन संस्था पुणे येथील शतपथ ब्राह्मण उत्कृष्ट वेद छात्र अध्ययन पुरस्काराने यांना सन्मानित केलेले आहे. तसेच अनेक संस्थांमध्ये वेद परीक्षक म्हणून सहभाग असतो.

आपले शिक्षण स्वतःपुरते मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य करण्यासाठी सध्या वैदिक ज्ञान विज्ञान संस्कृत महाविद्यालय (गुरुकुल) श्रीक्षेत्र नासिक येथे (२०१८ पासून) अध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

***



### अथर्ववेद – वेदमूर्तींचा परिचय

**वेदमूर्ती दिनेश कोंडूदेव जोशी**

- **जन्म** – २१/ ११/१९९२
- **अध्ययन** – अथर्ववेद शौनक शाखा संपूर्ण अध्ययन.
- **अध्ययन पाठशाला** – श्री चतुर्वेदेश्वर धाम आश्रम सावरगाव ता. परतुर जि. जालना गुरुजी – अथर्ववेदाचार्य वेदमूर्ती श्री. देशिक कस्तुरे गुरुजी (सावरगाव)

**परीक्षा उत्तीर्ण –**

- गणपती सच्चिदानंद आश्रम मैसूर कर्नाटक
- महर्षी सांदिपनी राष्ट्रीय वेद विद्या प्रतिष्ठान उज्जैन म. प्र.
- वेदशास्त्रोत्तेजक सभा पुणे

**पुरस्कार प्राप्त माहिती**

- वेद विभूषण पुरस्कार प्राप्त
- राष्ट्रीय वैदिक पुरस्कार

आपले कार्य – महर्षि सांदिपनी राष्ट्रीय वेदविद्या प्रतिष्ठान अंतर्गत सध्या पुणे येथे वेदपाठशाळेत अध्यापनाचे कार्य सुरू आहे.

---



### सामवेद – वेदमूर्तींचा परिचय

**वेदमूर्ती धोंडोपंत कांतराव शिराढोणकर**

- गुरूजींचे नाव – वेदमूर्ती कृष्ण मधुकर पळसकर
- पाठशाळेचे नाव – समर्थ वेद विद्यालय ढालेगाव ता.पाथरी. जि.परभणी
- अध्ययन कालावधी – १९९३ ते २०००
- अध्ययन – सामवेद राणायनी शाखा मूलांतम

**परीक्षा उत्तीर्ण**

- वेदशास्त्रोत्तेजक सभा पुणे
- महर्षी वेदव्यास प्रतिष्ठान पुणे, आळंदी
- गवामयन सत्र सोमयागामधे प्रतिहर्ता ऋत्विज म्हणून कार्यरत इतर सोमयागांमध्ये सहभागी

**सत्कार –**

- नरहरगुरू वैदिकाश्रम इंदोर
- महाकालेश्वर मंदिर ट्रस्ट उज्जैन,
- महर्षी वेदव्यास प्रतिष्ठान पुणे,
- यज्ञ सेवा समिती गंगाखेड,
- महर्षी सांदिपनी राष्ट्रीय वेद विद्या प्रतिष्ठान उज्जैन

**अध्यापन कार्य –** सच्चिदानंद वेद स्वाध्याय प्रतिष्ठान धनगर टाकळी, जि.परभणी इथे अध्यापनाचे १६ वर्षे कार्य केले.

सध्या नाशिक येथे श्रीक्षेत्र दत्तधाम मध्ये अग्निहोत्र घेऊन सामवेदाचे अध्यापन कार्य चालू आहे.

***

---



## * सामुहिक व्रतबंधन *

**चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक संस्थेतर्फे व्रतबंधन सोहळा कार्यक्रम दि.०३/०५/२०२६ रोजी सकाळी ८.०० वा. संस्थेच्या श्री परशुराम भवन येथे आयोजित करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी संस्था कार्यालय किंवा दिलेल्या फोन नंबरवर संपर्क करावा.**

**८३२९८९९६७८ / ०२५३-२५७६२४१ / ९८६०५१२२६७**



## * व्यवस्थापक / सहाय्यक पाहिजे *

**संस्थेचे दैनंदिन काम सांभाळण्यासाठी व्यवस्थापक/सहाय्यक व्यवस्थापक पदावर काम करण्यासाठी पुरुष/महिला कर्मचारी हवे आहेत. पात्रता पदवीधर, ऑफिस व्यवस्थापन अनुभव असल्यास प्राधान्य.**

**(वयोमर्यादा : वय ४५ ते ६०)**

**इच्छुकांनी श्री. नितीन सहस्त्रबुद्धे ९८५०६४७१७९ या नंबर वर संपर्क करावा.**

## श्री परशुराम पुरस्कार - २०२६ चे पुरस्कार्थी श्री. वसंतराव साठे यांचा अल्प परिचय

# आदिवासींच्या उन्नतीसाठी स्वतःला झोकून देणारे देवबांधचे साठे काका



'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणावे आपुले' देव तेथेची जाणावे, तोची साधू ओळखावा, या उक्तीप्रमाणे ठाणे जिल्ह्यातील १९ टक्के आदिवासी लोकवस्ती असलेल्या अतिदुर्गम मोखाडा तालुक्यात देवबांध नदीलगत सह्याद्री आदिवासी बहुविध सेवासंघ संचालित श्री सुंदर नारायण गणेश संस्कार केंद्रात कार्यकर्ता म्हणून कार्यरत असलेले श्री. वसंतराव साठे अर्थात येथील प्रत्येक आदिवासी जनसामान्यांचे साठे काका अविरतपणे गेली ४५ वर्षे आदिवासींच्या उत्रतीसाठी स्वतःला झोकून देत आहेत. त्यांनी आदिवासींची शैक्षणिक, सामाजिक व आरोग्यविषयक प्रगती व्हावी म्हणून अनेक माध्यमांतून उपक्रम राबवून आदिवासीं वनवासींची सेवा केली आहे.

काकांचे आयुष्य खडतर प्रवासामधून वळण घेत, मोखाडा-सारख्या अठरा विश्व दारिद्र्याने पछाडलेल्या भागात येऊन आदिवासींच्या उन्नतीसाठी स्थिरावून आजवर कार्यरत राहिले आहे.

साठेकाकांचा जन्म २३ मार्च १९३३ साली सोलापूर येथे झाला आहे. घरची परिस्थिती हलाखीची त्यांना तीन भाऊ आणि तीन बहिणी, तसेच आई वडील असा मोठा परिवार. त्यामुळे दहावीपर्यंत सोलापूर येथेच शिक्षण घेतले. पुढे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांचा मनावर पगडा बसला आणि पूर्ण वेळ कार्यकर्ता म्हणून संघाचे काम करण्यास त्यांनी स्वतःला झोकून दिले. वयाच्या २१ व्या वर्षापासूनच संघाच्या कामाच्या निरनिराळ्या जबाबदाऱ्या अंगावर पडल्याने, पूर्ण वेळ संघाचे काम सुरू केले. काकांकडे जनसंपर्क वाढविण्याची कला अवगत असल्याने, संघाचे कार्य करीत असतांना दांडगा जनसंपर्क निर्माण झाला, साठेकाका अविवाहित आहेत. म्हणून पूर्ण वेळ कार्यकर्ता राहण्यास त्यांना कुठल्याही अडचणी येत नाहीत.

दरम्यान, संघाचे काम सुरू असतानाच मुंबई येथील संघाच्या कार्यालयाची जबाबदारी वरिष्ठांनी काकांवर टाकली. त्यावेळी असंख्य उद्योगपती, दुकानदार, व्यापारी व स्वयंसेवी संस्था यांच्याशी काकांची जवळीक वाढली. त्याचा फायदा घेत काकांनी संघ परिवारातील असंख्य संस्थांना आर्थिक मदतही मिळवून देण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे. सतत २५ वर्ष त्यांनी मुंबईत संघ कार्यालयाची इमाने-इतबारे जबाबदारी सांभाळली आहे. १९७७ च्या आणीबाणी काळात संघाचा निष्ठावंत कार्यकर्ता असल्याने दोन वर्ष नाशिक कारागृहात कारावासही भोगला आहे. परंतु या कारावासाला न जुमानता काकांनी आपले कार्य पुढे अजून जोमाने सुरू केले.

तथापि कारावासानंतर आदिवासी वनवासी भागात काकांची खरी वाटचाल सुरू झाली आहे. सध्याही आदिवासी बहुविध सेवा संघाच्या सुंदर नारायण गणेश संस्कार केंद्रात पूर्ण वेळ कार्यकर्ता म्हणून नियुक्ती झाली. केंद्रास शून्यातून नावारुपास आणण्यात काकांचा सिंहाचा वाटा आहे. हे केंद्र केवळ तालुका, जिल्हा अथवा राज्यात नव्हे तर संपुर्ण भारतभर नावारुपास आले आहे. प्रत्येक क्षेत्रातील नागरिकांची, केंद्राशी नाळ जोडली जावी म्हणून काकांनी आपल्या जनसंपर्काच्या कलेतून हजारोंचे या केंद्राशी नाते जोडलेले आहे. देवबांध केंद्रात रुग्णसेवा, वस्तीगृह, गोशाळा, भाऊबीजभेट, स्मृतीवन व वनशेती अशा विविध प्रकारच्या योजना सुरू करण्यासाठी काकांचे मोठे योगदान आहे आणि या सर्व योजना आजमितीस सुरू असून कायमस्वरुपी या योजना सुरू राहतील याचे नियोजनही करण्यात काकांचा मोठा सहभाग राहिला आहे.

मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या नशिबी अठराविश्वे दारिद्र्य. शेती हा येथील आदिवासींचा मुख्य व्यवसाय. तो केवळ चार महिनेच असतो. चार महिने आदिवासींना रोजगार मिळतो. अन्य आठ महिने बेरोजगारी आणि उपासमारीचा सामना करीत आदिवासींना जीवन कंठावे लागत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर काकांनी या सर्व बाबींचा अभ्यास करून आदिवासी, वनवासी स्वतःच्या पायावर उभा कसा राहील. तो स्वयंपूर्ण कसा होईल, आणि स्वतःचा छोटा मोठा व्यवसाय सुरू कसा करेल यासाठी या आपल्या संपर्काच्या माध्यमातून हजारो आदिवासींना बँकेमार्फत कर्ज मिळवून दिले आहे व संसाराचा गाडा ओढण्यासाठी एक नवी दिशा दिली आहे. स्वतः अविवाहित असलेल्या काकांना मात्र संपूर्ण प्रापंचिक अडचणींची जाण आहे.

केंद्राच्या माध्यमातून काकांनी आदिवासींची आरोग्य विषयक समस्या सोडविली आहे. गरीबीने गांजलेल्या आदिवासींकडे स्वतःच्या प्रकृतीची काळजी घेण्यासाठी पैसा उपलब्ध नाही. त्यासाठी काकांनी केंद्रात प्रत्येक रविवारी रुग्ण सेवा सुरू केली आहे. डोळ्यांचे रुग्ण, दातांचे रुग्ण, अपघातातील जखमी, अवयव गेलेले रुग्ण तसेच अतिमहत्वाची शस्त्रक्रिया इ.साठी देखील काकांनी आपल्या जनसंपर्कातून आदिवासींची सेवा केली आहे. त्यासाठी साठेकाकांनी डॉ. सपाटणेकर, डॉ. शुक्ला, डॉ. जोशी, डॉ.

नामजोशी व डॉ. सादले अशा विविध विषयांतील तज्ञ डॉक्टरांची मदत घेऊन केंद्राला तसेच आदिवासींना त्यांची सेवा कायमस्वरुपी मिळवून देण्यात काकांनी यश मिळविले आहे.

शहरवासीयांचा आदिवासी भागातील भगीनींना मदतीचा हातभार लागावा म्हणून डॉ. केशवराव केळकर यांची भाऊबीज भेट योजना केंद्राच्या माध्यमातून सुरू केली आहे. ती आज ४५ वर्षांपासून सुरळीत सुरू आहे. या योजनेचा आजवर हजारों आदिवासी भगिनींना लाभ मिळाला आहे या योजनेसाठी लगतच्या घोटी, इगतपुरी, जव्हार, मोखाडा, वाडा, कसारा, खर्डी, नाशिक, ठाणे, मुंबई तसेच डोंबिवली परिसरातील दानशूर व्यक्ती कायम स्वरुपी देणगीच्या रुपात जोडण्यात काकांनी मोठे परिश्रम घेतले आहेत. गेली ४५ वर्षे आदिवासींची सेवा अनेक माध्यमातून काकांच्या हातून घडत असल्याने काकांचे प्रत्येक आदिवासींच्या मनात श्रध्देचे स्थान निर्माण झाले आहे. प्रत्येक कुटुंबाचा साठे काका हे अविभाज्य घटक बनले आहे.

आज वयाची ९३ वर्षे पूर्ण करणाऱ्या आणि आजही तरुणाप्रमाणे जोमाने साठेकाका प्रत्येक कार्यक्रम यशस्वी करीत आहेत. अनेक उपक्रम, काकांच्या तरुणांना लाजवेल अशा प्रयत्नातून साकारले जात असून यशस्वीही होत आहेत. काकांच्या या कार्यास लाख लाख शुभेच्छा ! काकांस दिर्घायुष्य लाभो व त्यांचे शतक महोत्सव साजरे करण्याचे आम्हास भाग्य लाभो हीच ईश्वरी चरणी प्रार्थना.

***

## चित्तपावन ब्राह्मण संघ : वर यादी


| नाव, पत्ता व फोन | जन्म तारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| **कु. समीर संतोष जोशी**<br>फ्लॅट नं.५, श्रीहरी अपार्टमेंट, शरद हॉस्पिटलमागे, रामचंद्र नगर, छत्रपती संभाजी नगर<br>**मोबा.:** ९५६१२९५८८७ | २१/१०/१९९८ | शांडिल्य | ५.७'' | बी.ई. कॉम्प्युटर | १,२०,०००/- |
| **कु. सर्वेश मनिषा विनोद मराठे**<br>प्रतापगड अपार्टमेंट, पहिला मजला, खापर्डे बगीचा, अमरावती. **मोबा.:** ९५६११००५२६ | ०२/०९/१९९५ | कपी | ६'' | एम.ए. जे.एम.सी. | १७,०००/- |

## चित्तपावन ब्राह्मण संघ : वधू यादी

| नाव, पत्ता व फोन | जन्म तारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| **कु. यशश्री किशोर उपासनी (भाटे)**<br>एन ९/०३०/१/ तुळजा भवानी चौक, जुने सिडको, नाशिक. **मोबा.:** ९९२३१३६०४७ | २१/०८/१९९९ | चंद्रात्रे | ५.९'' | बी.कॉम. | ----- |

### चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक
## देणगीदार - मार्च २०२६

| क्रमांक | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ०१ | श्री. मंदार वेलणकर (वैद्यकिय शिक्षणासाठी) | २५,०००/- |
| ०२ | श्री. गंगाधर दिलीप खाडिलकर | ५,०००/- |



## भावपूर्ण श्रद्धांजली...

- आपल्या संस्थेचे सभासद उद्योजक श्री. जयंत जोगळेकर यांचे वडील नागेश विष्णू जोगळेकर सेवानिवृत्त पोलीस अधिकारी यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ९१ व्या वर्षी नाशिक येथे दि. २५/३/२०२६ रोजी दुःखद निधन झाले. संस्थेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली !




ॐ

जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले।।

# सह्याद्री आदिवासी बहुविध सेवा संघ

देवबांध (नाशेरा), पो. खोडाळा, ता. मोखाडा, जि. पालघर- ४०१ ६०४

**केंद्र प्रमुख वसंत साठे मो ९३०९०६२१२९**

सह्याद्री आदिवासी बहुविध सेवा संघ देवबांध ही संस्था ४७ वर्षांपूर्वी स्थापन झाली. पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील नाहोरा ग्रामपंचायत असून ही सर्व जागा नाशिकच्या श्री सुंदर नारायण देवस्थान, पंचवटी, नाशिक या संस्थेची असून त्याचे ट्रस्टी श्री.नारायणराव पुजारी, यांचा परिचय कै. मोरोपंत पिंगळे यांच्या-बरोबर होता. पूर्णपणे जंगल भाग असा परिसर, त्या परिसरात राहणाऱ्या आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी काम सुरू करावे ह्या विचाराने कै. नारायणराव पुजारी यांच्याशी बोलणी झाल्यानंतर त्यांनी ही जमीन आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी ९० वर्षांच्या कराराने संस्थेला दिली.

ही जागा मिळाल्यानंतर ह्या संपूर्ण जागेची पाहणी होऊन खालील प्रकारे कामाची सुरुवात झाली.

- पुण्याचे कै. बाबा लेले यांच्या प्रयत्नातून गोर-गरीब आदिवासी बांधवांच्या आरोग्यासाठी रुग्ण सेवा सुरू झाली, दोन वर्ष नियमितपणे त्यांनी सेवा दिली. अती दूर अंतरावरुन येण्याऱ्या डॉक्टर सहकारी मंडळींना जाण्या-येण्याच्या होणाऱ्या त्रासातून सुटका होण्यासाठी, त्यांना मुक्कामी राहण्यासाठी सोय करून गेली ३५ वर्षे ही आरोग्य सेवा यशस्वीपणे राबविली जात आहे. या कामी ठाण्याच्या कै. सापटेणकर यांनीही या सेवेसाठी बहुमोल सहकार्य दिले आहे. या योगदानाने गोर-गरीब आदिवासींचे आरोग्य चांगल्या प्रकारे सावरू लागले. विविध प्रकारच्या आजारांसाठी स्त्री रोग / कान-नाक-घसा / बालरोग / नेत्र डॉक्टर मंडळींकडून विशेष शिबिरे भरवून या आजारांवर उपचार झाल्यामुळे रुग्णांना आधार मिळाला. अनेक दानशूर व्यक्तींनी आर्थिक मदत केल्यामुळे अनेक शस्त्रक्रिया करवून अनेक रुग्ण झाले आहेत.
- अत्यंत गरीबी असल्यामुळे मुलांच्या शिक्षणासाठी खर्चही ते देऊ शकत नाहीत. म्हणून शैक्षणिक साहित्यासाठी जे देणगी देतील अशा दानशूर व्यक्तींकडून वह्या, पेन, पेन्सिल, रबर, शॉर्पनर, स्कूल बॅग, छत्री, गणवेशासाठी कापड अशा वस्तू देण्याच्या कामास सुरुवात होऊन आज आपण ३० हजारापेक्षा जास्त मुलांना आर्थिक व वस्तू रुपाने जे मदत करू शकतात अशा दानशूरांशी सतत संपर्क ठेवून त्यांच्याकडून मदत मिळवून आपण मदत करीत आहोत,

अशा प्रकारे दानशूर व्यक्तींशी संपर्क साधून आणि पत्रव्यवहार करून, याद्वारे आवश्यक ती मदत मिळवून आज संस्ता व्यवस्थित कार्य करीत आहे.

ज्या-ज्या संस्था समाजोपयोगी कामे करीत आहेत अशा संस्थानीही हे व्रत अंगिकराले तर त्याही संस्था चांगल्या होऊ शकतात. असा आमचा पुर्ण विश्वास आहे,

***



**सह्याद्री आदिवासी बहुविध सेवा संघ या देवबांध, मोखाडा येथील प्रकल्पाचे प्रमुख श्री.वसंतराव साठे**




चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेच्या मालकीचा हा अंक संपादक व **प्रकाशक श्री. विजय राजाराम साने,** यांनी श्री गणेश एंटरप्राईजेस, शिवनेरी कॉम्प्लेक्स, वावरे लेन, शिवाजी रोड, शालीमार, नाशिक येथे छापून **'श्री परशुराम भवन'**, एस.बी.आय.बँकेसमोर, सी.बी.एस. नाशिक-४२२००२ येथे प्रसिद्ध केला.

**चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक. फोन : ०२५३-२५७६२४१**

प्रति, ______________________

______________________

______________________

## संस्थेची वेबसाईट :-

- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http://facebook.com/nasikchitpavan
- Website : www.nasikchitpavan.org
- http://twitter.com/nasikchitpavan
- http://youtube.com./user/nasikchitpavan

या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. 'चित्तपावन मित्र'च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.

RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दराची तिकिटे लाऊन पोस्टाने पाठविण्याचा परवाना NSK / RNP-231/2021-2023
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O. मधून वितरित केला जातो.